# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 15.11.2024** **वार – शुक्रवार**

---

**प्रचार**

गेल्या दहा वर्षात भाजपा कडे भरीव विकासाचे मुद्दे नाहीत, अशी टीका कर्नाटकचे माहिती तंत्रज्ञान मंत्री प्रियांक खार्गे यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत केली. यावेळी त्यांनी काँग्रेसच्या पंचसूत्री गॅरंटीचा पुनरुच्चार करत सत्तेवर आल्यास राज्याची अर्थव्यवस्थेत सुधारणा करू असंही त्यांनी नमूद केलं. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते खासदार संजय राऊत यांनी आज कोथरूड विधानसभा मतदारसंघांतील पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयाला भेट देऊन कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं. महाराष्ट्रात पुन्हा महाविकास आघाडीचेच सरकार सत्तेवर येईल असा दावा त्यांनी केला. भाजपा महायुतीचे उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्तेही प्रचारात गुंतले असून मतदारांच्या प्रत्यक्ष गाठी-भेटी घेण्यावर भर दिला जात आहे. वंचित बहुजन आघाडीच्या पुण्याच्या विविध मतदारसंघांतील उमेदवारांच्या प्रचारासाठी पक्षाचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांची सभा उद्या अहिल्याश्रमाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय पटांगणात होणार आहे.

**जनजागृती**

विधानसभा निवडणुकीत जास्तीत जास्त पात्र मतदारांनी मतदान करावं या दृष्टीनं निवडणूक यंत्रणेच्या वतीनं मतदान जनजागृती अभियान राबवलं जात आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने विविध महाविद्यालयातील  नवमतदारांना मतदानाची शपथ देण्यात आली. तसंच यावेळी मतदान जनजागृतीपर पथनाट्य, मतदान विषयक प्रश्नमंजुषा असे विविध उपक्रम घेण्यात आले. बारामती विधानसभा मतदारसंघात अंगणवाडी सेविकांनी विविध गावांत ‘गजर लोकशाहीचा’ हे पथनाट्य सादर केलं. मतदारांसाठी केंद्रावर असलेल्या सुविधा, वोटर हेल्पलाइन ॲप, हिरकणी कक्ष, पाळणाघर, सक्षम ॲप या बाबत पथनाट्याद्वारे माहिती देण्यात आली.

**चिठ्ठ्यावाटप**

पुरंदर विधानसभा मतदारसंघातील मतदारांना त्यांची मतदान केंद्र आणि अनुक्रमांक या तपशीलाची माहिती सुलभरितीने उपलब्ध होण्याकरिता निवडणूक कार्यालयामार्फत मतदार चिठ्ठ्यांचं वाटप सुरु

करण्यात आलं आहे. निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा लांडगे यांनी आज ही माहिती दिली. पुरंदर विधानसभा मतदारसंघांमध्ये 4 लाख 64 हजार 17 मतदार असून 418 मतदान केंद्र आहेत.

**आरोग्यसेना**
राजकीय पक्ष आणि भावी लोकप्रतिनिधींना, महाराष्ट्राच्या सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रात असणाऱ्या आव्हानांची जाणीव करून देण्यासाठी आरोग्य सेनेतर्फे खुल्या जाहीरनाम्याचं प्रकाशन आरोग्य सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अभिजित वैद्य यांच्या हस्ते काल पुण्यात करण्यात आलं. औषधांच्या किमतीवर कडक नियंत्रण ठेवणे, बालकांच्या आरोग्यासाठी अधिक तरतूद करणे यासह विविध मागण्या या जाहीरनाम्यात करण्यात आल्या आहेत.

**नानक जयंती**
शिखांचे गुरू गुरूनानक देवजींच्या 555 व्या जयंतीनिमित्त आज पुणे आणि पिंपरी चिंचवडमधल्या गुरूद्वारांमध्ये कथाकीर्तन, धार्मिक कार्यक्रम आणि लंगरचं आयोजन करण्यात आलं होतं. पुणे छावणी परिसरातील गुरूनानक दरबार इथं धार्मिक कार्यक्रमाबरोबरच रक्तदान शिबिर आणि आरोग्य तपासणी सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली होती.

**कार्तिकी पौर्णिमा**
कार्तिकी पौर्णिमेनिमित्त आज पुण्यात ठिकठीकाणी दीपोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. तसंच पर्वतीवरच्या कार्तिक स्वामी मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली आहे.

**बिरसा मुंडा**
जननायक बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त आज देशभरात सर्वत्र त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातही बिरसा मुंडा यांच्या कार्याचं स्मरण करून त्यांना अभिवादन करण्यात आलं. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचं योगदान अतुलनीय आहे असं कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी यांनी यावेळी सांगितलं.

**कोन्निचीवा पुणे**
भारत आणि जपान यांच्यातील दृढ मैत्रीचा सोहळा पुण्यात साजरा करण्यात येणार आहे. त्यासाठी इंडो जपान बिजनेस कौन्सिलच्या वतीने उद्या आणि परवा 'कोन्निचीवा पुणे" हा दोन दिवसीय सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. जपानी संस्कृतीचे सौंदर्य आणि परंपरा यांचा अनुभव घेण्याची संधी या माध्यमातून पुणेकरांना मिळणार आहे. इंडो जपान बिजनेस कौन्सिलचे अध्यक्ष सिद्धार्थ देशमुख आणि असोसिएशन ऑफ फ्रेंड्स ऑफ जपानचे अध्यक्ष अँडवोकेट समीर

खळे  यांनी आज पुण्यात ही माहिती दिली. सिंहगड रस्त्यावरील पु ल देशपांडे कलाग्राम इथं दुपारी तीन ते सायंकाळी आठ या वेळेत हा कार्यक्रम होणार आहे.

**क्रीडा**

पूना जिल्हा फुटबॉल संघटनेचे अनुभवी प्रशिक्षक परेश शिवलकर यांची 78व्या राष्ट्रीय फुटबॉल 2024-25 स्पर्धेच्या पात्रता फेरीसाठी महाराष्ट्र संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राज्याच्या 22 सदस्यीय संघात पुण्याच्या सुमीत काटे आणि सुमीत भंडारी या दोन खेळाडूंना स्थान मिळालं आहे. ही पात्रता फेरी उद्यापासून  जयपूर इथं होणार आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर ढगाळ हवामान होतं, उद्याही हवामान अंशतः ढगाळ राहून किमान तापमान 19 अंशांच्या आसपास राहणार राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**